# वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती 'आय' जाहीर निविदा सुचना

वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील खालील उल्लेख केल्या प्रमाणे विकास काम करणेसाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी – १ नमुन्यात व्दिलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. १०/०१/२०१९ ते दि. २५/०१/२०१९ या दिवशी सायं. ४.०० वाजेपर्यंत सुट्टीच्या दिवसांखेरीज महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' कार्यालयातील बांधकाम विभागात रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टव्दारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदा सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टव्दारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि. २९/१/२०१९ रोजी दु.३.०० वाजे पर्यंत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'आय' कार्यालयातील बांधकाम विभागाकडे बंद निविदा पेटीमध्ये टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा प्रभाग समिती 'आय' कार्यालयात निविदा समिती समोर हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी सायं. ४.००वा. प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. या कामी आलेल्या निविदा पैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम रू | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ११४ मधील किल्लाबंदर येथील डॉमनिक मस्तान ह्यांचे घर ते दिलीप माठक ह्यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे. | रू.२,८८,५४१/- | रू.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| २ | वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी चणेबोरी नाक्यावर आर. सी. सी. पाईप क्रॉसिंग बांधणे. | रू.१,२६,९८९/- | रू.१३००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ३ | वॉर्ड क्र. १०८ मधील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करणे. | रू.१,९५,१९३/- | रू.२०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ४ | वॉर्ड क्र. १०८, ११० व ११२ मधील शौचालयांना रॅम्प बनविणे. | रू.९१,२८८/- | रू.१०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ५ | वॉर्ड क्र. १११ मधील आईस फॅक्ट्री लगतच्या शौचालयाच्या स्लॅबचीं दुरुस्ती करणे. | रू.८२,१०१/- | रू.९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ६ | वॉर्ड क्र. ११४ मधील गटारावरील उघड्या चेंबर्सवर लोखंडी झाकणे पुरविणे व बसविणे. | रू.२,९६,४२४/- | रू.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ७ | वॉर्ड क्र. १०६ मधील उमेळा व नायगाव येथील गटारावरील उघड्या चेंबर्सवर लोखंडी झाकणे पुरविणे व बसविणे. | रू.२,९६,४२४/- | रू.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | वॉर्ड क्र. ११४ मधील वायाबंदर येथील विजय बुरखाव ह्यांचे घर ते जॉन्सन बुरखाव ह्यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे. | रु.२,८५,५६०/- | रु.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ९ | वॉर्ड क्र. ११२ मधील ६०फुटी रस्त्यावरील उघाडीलगत दगडी संरक्षक भिंत बांधणे. | रु.६२,००४/- | रु.७००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १० | वॉर्ड क्र. ११० मध्ये विविध ठिकाणी लोखंडी चेंबर कव्हर्स पुरविणे व बसविणे. | रु.२,८१,७४२/- | रु.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| ११ | वॉर्ड क्र. १०७ मधील शौचालयातील रॅम्प बांधणे व सभोवताली कॉंक्रिटीकरण करणे. | रु.१,५६,३११/- | रु.१६००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १२ | वॉर्ड क्र. ११४ मधील पाचूबंदर येथील नमिन सजन हयांचे घर ते विनोद पाटील हयांचा घरापर्यंतच्या गटारावर स्लॅब टाकणे. | रु.२,५०,७७८/- | रु.२६००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १३ | वॉर्ड क्र. ११४ मधील किल्लाबंदर येथील ॲलोप खांडल्या ह्यांचे घर ते केवीन बारुख ह्यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे. | रु.२,७८,१९०/- | रु.२८००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १४ | वॉर्ड क्र. ११४ मधील किल्लाबंदर, लागेबंदर जे. टी. नंबर -१ जवळील एम. एम. आर.डी. ए. शौचालयाची दुरुस्ती करणे व बाजू जवळील परीसरात पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे. | रु.२,८३,२२२/- | रु.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १५ | वॉर्ड क्र. ११० मधील लक्ष्मी चाळीमध्ये विविध कामे करणे. | रु.१,६४,५४३/- | रु.१७००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १६ | वॉर्ड क्र. १०९ मधील बेणापट्टी घोगाळे वाडी येथील डेव्हीड डिकुन्हा व अल्बर्ट घरशी हयांच्या घरासमोरील बावखळास लोखंडी रेलींग व गटारावरील चेंबर कव्हर पुरविणे व बसविणे. | रु.२,५३,२६९/- | रु.२६००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १७ | वॉर्ड क्र. ११२ मधील विविध ठिकाणी लोखंडी चेंबर कव्हर्स पुरविणे व बसविणे. | रु.२,८१,०९३/- | रु.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १८ | वॉर्ड क्र. ११० मधील माऊली अपार्टमेंट लगत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२,९९,३३९/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| १९ | वॉर्ड क्र. ११० मधील शारदा घरासमोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२,९५,४४४/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| २० | वॉर्ड क्र. ११० मधील यश बंगल्या समोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.२,९९,३३९/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | प्रभाग समिती "आय" कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०६ मधील उमेळा तलावावरील पेव्हर ब्लॉकची दुरुस्ती करणे. | रु.२,८२,८७२/- | रु.२९००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| २२ | वॉर्ड क्र. १०३ मध्ये गिरीज पालशेत वाडी आल्मेडा घर ते मनपा हद्दीपर्यंत पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे. | रु.२,९८,९०३/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| २३ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील गटारावरील उघडया चेंबरवर लोखंडी चेंबर कव्हर पुरविणे व बसविणे. | रु.२,९७,१८४/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |
| २४ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील पायवाटेवरील खडी ग्रीट मटेरियल पुरवठा करुन पसरविणे. | रु.२,९८,३३३/- | रु.३०००/- | रु.२००/- १८% GST | २% डी.डी. ने व २% बिलातून | ४५ दिवस |

अटी :-

१) कोरे निविदा फॉर्मची मागणी करते वेळी अर्जासोबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या ठेकेदाराचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्र आहे. त्यांची मुळ कागदपत्रासह स्वत: अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत कोरे निविदा फॉर्म घेवून जाणे आवश्यक आहे.

३) सदरहु कामांच्या निविदेसाठी द्वि लखोटा पध्दतीची अवलंब करावयाचा आहे.

४) ठेकेदारांनी निविदा भरताना (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे.

५) निविदा धारकांनी सादर केलेल्या तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ मध्ये

   १. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य वर्गातील नोंदणी प्रमाणपत्रांची छायांकित प्रत
   २. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र
   ३. रु.१००/- स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
   ४. इसारा रक्कमेचा धनाकर्ष

   सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसतील तर निविदा बोलीचा लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

६) निविदा प्रक्रिये मध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्क्यापेक्षा अधिक दराने कमी दरात काम करण्याच नियोजनाबाबत सविस्तर तपशील निविदेसोबत लिफाफा क्र. २ मध्ये जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास निविदा मंजुर करण्यात येणार नाही.

७) अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (परफॉमर्न्स सिक्युरिटी डिपॉझिट) लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने अतिरिक्त परफॉमर्न्स सिक्युरिटी डिपॉझिट आठ दिवसाच्या आत प्रभाग समिती कार्यालय बांधकाम विभागात सादर करण्यात यावा.

८) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढया किंमतीची व १५% पेक्षा कमी दराचा असल्यास दोन पटीने रक्कम बॅकेची प्रतिपुर्ती हमी/धनाकर्ष (डी.डी) परफॉमर्न्स सिक्युरिटी म्हणून L-१ निविदा धारकाने आठ दिवसात सादर करावा. (उदा १०% कमी दरापर्यत १% व १५% कमी दरापर्यत-(१५% - १०% = ५%) तसेच (१९-१५) = ४% करीता (४x२=) ८% असे एकूण (१+५+८) = १४% )

९) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल ते देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया रक्कमेचा व वरील बाब - ७ प्रमाणे बॅकेची प्रतिभुर्ती हमी/धनाकर्ष निविदेसोबत लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावी.(उदा.१४% कमी दर - १०% पर्यत करिता -१% व (१४% -१०%) - ४% असे एकूण ५%) ही रक्कम रु.१०००/-पेक्षा कमी असल्यास किमान रु.१०००/- (एक हजार) चही बॅकेची प्रतिपुर्ती हमी/धनाकर्ष (डी.डी.) सादर करणे अनिवार्य राहील.

१०) धनाकर्ष परत करणे/ बँक प्रतिभुर्ती हमी उपलब्ध करुन करुन देणे / बॅंकेची प्रतिभुती हमी परत करणे व इतर बाबींवर खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

   अ) धनाकर्ष / बॅंक प्रतिभुती हमी आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या नावे असावी.

ब) धनाकर्ष /बँक प्रतिभुती हमी सरकारी / शेडयुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील [illegible]ची असावी.
क) बँक प्रतिभुती हमीची मुदत कामाच्या दोष दायित्व कालावधीनुसार एक महिना कालावधी पर्यंत असावी.
ड) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / बँक प्रतिभुती हमी सादर करणा-या कंत्राटदाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदरांना काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच अशा काळया यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडण्यात येणार नाही.

११) सदर कामाबाबत निविदाधारकाकडून तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्यात येतील. तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

१२) निविदा बाबत अधिक माहीतीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रभाग समिती "आय" वसई या कार्यालयाशी संपर्क साधावा.

जा.क्र.वविशम/बांध/ ५१२/१८
दिनांक : ८/१/१९

| (आर.के.पाटील) | (मनोज वनमाळी) | (किशोर गवस) | (संजय हेरवाडे) |
| --- | --- | --- | --- |
| सहा.अभियंता | प्र.सहा.आयुक्त | उप- आयुक्त | अति.आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी |
| प्रभाग समिती आय | प्रभाग समिती आय | वसई विरार शहर महानगरपालिका | वसई विरार शहर महानगरपालिका |
| वसई विरार शहर महानगरपालिका | वसई विरार शहर महानगरपालिका | | |